ePaper

# ‘आमच्याकडे मान-अपमान मनात होतो, त्याचं संगीत मीडियात वाजतं’, देवेंद्र फडणवीस




वर्ष - 8 । अंक -165 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 24 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




खर्गे यांच्या अब्रूची लक्तरं टांगली संसदेच्या वेशीवर !

विशेष संपादकीय

पान 4 वर

## पुण्यात महापालिका निवडणुकीच्या तोंडावर

# राजकीय भूकंपाचे संकेत!

## ठाकरे गटात पडद्यामागे काय घडतंय?

**। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**पुण्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांची बैठक खासदार संजय राऊत यांनी घेतली. मात्र, या बैठकीला पक्षाचे माजी नगरसेवक अनुपस्थित राहिले. लोकसभा निवडणुकीतील यशानंतर विधानसभेत झालेल्या पराभवानंतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी पक्ष करत आहे. या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवकांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर पक्षाला धक्का बसू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे.**

लोकसभा निवडणुकीत जोरदार यश संपादन केल्यानंतर विधानसभा निवडणुकीत देखील अशाच कामगिरीची महाविकास आघाडीला अपेक्षा होती. मात्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला या पराभवातून बाहेर येत आता महाविकास आघाडीतील पक्षांनी पक्ष संघटना बांधणीवर भर देत येत्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीला सामोरे जाण्याचा चंग बांधला आहे. यासाठीच शिवसेनेचे ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) नेते आणि खासदार संजय राऊत यांनी पुण्यामध्ये कार्यकर्त्यांची एक बैठक घेतली. मात्र या बैठकीला माजी नगरसेवकांनी मारलेली दांडी हा चर्चेचा विषय ठरला आहे.

संजय राऊत यांनी मुंबईत महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा स्वतःच केल्यानंतर पुण्यात मात्र कार्यकर्त्यांचा विचार घेऊनच निर्णय घेऊ असं स्पष्ट केलं होतं आणि त्यानंतर पक्ष पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पुणे आणि पिंपरी चिंचवडच्या कार्यकर्त्यांची बैठक घेतली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर ठाकरे सेनेचे शिलेदार पालिका निवडणुकी बाबत काहीसे संभ्रमात असल्याचं बोलले जात आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीच्या पूर्वी शिवसेना ठाकरे गटाला धक्के बसण्याची शक्यता आहे. कारण संजय राऊत यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये ठाकरे गटाचे सर्व चे सर्व माजी नगरसेवक हे अनुपस्थित राहिल्याने हे चर्चा आता सुरू झाले आहेत.

गेल्या महापालिका निवडणुकीत एकत्रित शिवसेनेने पुण्यात दहा ठिकाणी विजय मिळवला होता. त्यानंतर शिवसेनेच्या फुटीचा सर्वात कमी फटका हा पुणे शहरात बसला होता. कारण एकनाथ शिंदे सोबत त्यावेळेस फक्त एकच नगरसेवक गेला होता. तर, लोकसभा निवडणुकी वेळी शिवसेनेचे माजी नगरसेवक असलेल्या अविनाश साळवे यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे सद्य परिस्थितीला आठ माजी नगरसेवक हे शिवसेना उद्धव ठाकरे पक्षा सोबत आहेत. हे आठही माजी नगरसेवक संजय राऊत यांच्या बैठकीला उपस्थित नव्हते.



### पुण्यात उद्धव ठाकरे यांना बसणार धक्के

शिवसेना फुटल्यानंतर जे धक्के उद्धव ठाकरे यांना पुण्यात बसले नव्हते ते महापालिका निवडणुकीच्या तोंडावर बसणार का याची चर्चा आता सुरू झाली आहे. दरम्यान दुसरीकडे, या बैठकीबाबत निरोप आदल्या दिवशी सायंकाळी अचानक मिळाल्याने आणि बैठकीच्या दिवशीचा प्रोग्रॅम आधीच फिक्स झाल्याने बैठकीला उपस्थित राहू शकलो नाही असं काही नगरसेवकांनी सांगितल आहे.

## ‘सीसीटीव्ही’ कॅमेऱ्यांच्या फुटेजवरून वाहनचालकांची तपासणी

## 3 कोटी दंड वसूल, गेल्या 11 महिन्यांमध्ये 41 हजार 695 बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

शहरातील मुख्य चौकांमध्ये लावण्यात आलेल्या ‘सीसीटीव्ही’ कॅमेऱ्यांच्या फुटेजची पाहणी करून गेल्या अकरा महिन्यांमध्ये ४१ हजार ६९५ बेशिस्त वाहन चालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. त्याद्वारे तीन कोटी चार लाख २५ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील मुख्य चौकांमध्ये २५० ‘सीसीटीव्ही’ कॅमेरे बसविण्यात आले होते. परंतु, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईसाठी ‘सीसीटीव्ही’ फुटेज पाहण्याची व्यवस्था नव्हती. त्यानंतर स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत शहरात साडेतीन हजार ‘सीसीटीव्ही’ कॅमेरे बसविण्यात आले. त्याच्या जोडणीचे काम ऑगस्ट २०२२ मध्ये पूर्ण झाले. तेव्हापासून स्मार्ट सिटीच्या निगडी येथील कार्यालयातून वाहन चालकांवर कारवाईला सुरुवात झाली आहे. पांढऱ्या आणि काळ्या पट्ट्यावर ( झेब्रा क्रॉसिंग) उभी राहणारी वाहने, एका दुचाकीवरून तिघे जण प्रवास करणारे, सीट बेल्ट न वापरणारे चारचाकी वाहनचालक, नो-एन्ट्रीतून येणारी वाहने, वाहतूक नियंत्रण दिवे (सिग्नल) तोडणाऱ्या वाहनांवरील कारवाईला आता वेग आला आहे. सीसीटीव्हीद्वारे कारवाईसाठी पाच पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे.

स्मार्ट सिटी प्रकल्पातील साडेतीन हजार कॅमेरे कार्यान्वित झाले आहेत. भ्रमणध्वनीवर संदेश पाठवून कारवाईची माहिती दिली जात आहे.

# डम्परने नऊ जणांना चिरडलं!

## पोटाची खळगी भरण्यासाठी अमरावतीहून पुण्यात आले होतो मजूर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील वाघोली पोलीस स्टेशन समोरील फुटपाथवर झोपलेल्या तिघांना डंपरने चिरडल्याची घटना घडली आहे.या तीन मृतांमध्ये 22 वर्षाचा तरुण,एक वर्षाची मुलगी आणि दोन वर्षाच्या मुलाचा समावेश आहे. तर हे दोघे जण बहिण भाऊ आहेत.या घटनेतील आरोपी गजानन शंकर तोट्रे हा डंपर चालक दारु पिऊन डंपर चालवित असल्याचे तपासात समोर आले असून त्याला अटक करण्यात आली आहे. त्याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पुण्यात वाघोलीच्या केसनंद परिसरात एक अतिशय भीषण अपघात झाला. या अपघातात डम्परने तब्बल नऊ जणांना चिरडले. पोटाची खळगी भरण्यासाठी हे मजूर अमरावतीहून पुण्यात दाखल झाले होते. मात्र, पुण्यात यायला उशीर झाल्याने सर्वजण वाघोली पोलीस स्टेशन समोरील फुटपाथवर रविवारी रात्री झोपले होते. त्या रस्त्यावरून रात्री एक वाजण्याच्या सुमारास आरोपी डंपर चालक गजानन शंकर तोट्रे (26 वर्षे) राहणार नांदेड याने त्याच्या ताब्यातील MH 12 VF 0437 या क्रमांकाच्या डंपरने फुटपाथवर झोपलेल्या नऊ जणांना चिरडले. डम्पर चालक गजानन तोट्रे गेल्या अनेक वर्षांपासून जड वाहन चालवतो. घटनास्थळावरून डम्पर चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अपघातामधील मृत कामगार हे अमरावतीमधील आहेत. विशाल विनोद पवार (वय 22), वैभवी रितेश पवार (वय 1), वैभव रितेश पवार (वय 2) अशी मृतांची नावे आहेत. या तीन मृतांमध्ये वैभवी आणि वैभव बहिण भाऊ आहेत. जानकी दिनेश पवार, रिनिशा विनोद पवार, रोशन शशादू भोसले, नगेश निवृत्ती पवार, दर्शन संजय वैराळ आणि आलिशा विनोद पवार हे सहा जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर ससून रूग्णालयात उपचार सुरू आहेत. सहापैकी तीन जणांची प्रकृती गंभीर असल्यचीही माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. जखमींना जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यानंतर त्यांना ससून रूग्णालयात दाखल करण्यात आले. रस्त्याची सुधारणा व्हायला पाहिजे. याबद्दल मी विधानसभेत प्रश्न मांडणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या घटनेनंतर सगळीकडे हळहळ व्यक्त केली जात आहे.अचानक डंपरचा जोरदार आवाज आला आणि आम्ही खाडकन उठलो, समोरचं दृश्य पाहून आम्हाला काही सुचेना. आम्ही जागेवरून उठून मदत करेपर्यंतच सगळा खेळ खल्लास झाला होता, तिघजणं तर जागीच ठार झाले होते, रुग्णालयापर्यंतही पोहोचता आलं नाही. इतर जखमींना कसंबस रुग्णालयात नेलं, पण माझ्या मुलांचा जीव काही वाचू शकल नाही. ते एवढे जखमी झाले की रुग्णालयात पोहोचेपर्यंत त्यांचा श्वास थांबला होता, असे सांगताना पित्याचे हृदय पिळवटून निघालं.

### चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले

घटनास्थळावरून डम्पर चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अपघातामधील मृत कामगार हे अमरावतीमधील आहेत. विशाल विनोद पवार (वय 22), वैभवी रितेश पवार (वय 1), वैभव रितेश पवार (वय 2) अशी मृतांची नावे आहेत. या तीन मृतांमध्ये वैभवी आणि वैभव बहिण भाऊ आहेत. जानकी दिनेश पवार, रिनिशा विनोद पवार, रोशन शशादू भोसले, नगेश निवृत्ती पवार, दर्शन संजय वैराळ आणि आलिशा विनोद पवार हे सहा जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर ससून रूग्णालयात उपचार सुरू आहेत. सहापैकी तीन जणांची प्रकृती गंभीर असल्यचीही माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

# अपघातस्थळी अजित पवार यांची भेट

## मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत देण्याचा निर्णय

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाघोली अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला जाईल. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहे. अपघातातातील जखमींवरील उपचारांचा खर्च शासनाकडून केला जाईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.**

नगर रस्त्यावरील वाघोली भागात मद्यधुंद डंपरचालकाने पदपथावर झोपलेल्या नऊ जणांना सोमवारी रात्री चिरडले. अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तसेच सहा जण गंभीर जखमी झाले. अपघाताची घटना घडल्यानंतर अजित पवार यांनी वाघोली पोलीस ठाण्यासमोर असलेल्या घटनास्थळाला सोमवारी दुपारी भेट दिली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.पवार म्हणाले, ‘अपघाताची घटना दुर्देवी आहे. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची मदत करण्याचा निर्णय घेतला जाईल. अपघातात जखमी झालेल्यांच्या नातेवाईकांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी अमरावती जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करू’. अमरावतीत उद्योगधंदे नाहीत. बेरोजगारीमुळे पुण्यात यावे लागते. डंपर अपघातात ‘होत्याचे नव्हते’ झाले. शासनाने आम्हाला नोकऱ्या उपलब्ध करुन द्याव्यात, अशी विनंती अपघातात मृत्युमुखी



पडलेल्यांच्या कुटुंबीयांनी केली. वाघोली अपघात प्रकरणात डंपरचालक गजानन तोटरे याला अटक करण्यात आल्यानंतर सोमवारी त्याला शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीने केलेला गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. आरोपीने मद्यप्राशन कोठे केले, तसेच त्याच्याबरोबर कोण होते, त्याच्याकडे वाहन परवाना आहे का ? याद्दष्टीने तपास करायचा आहे. तपासासाठी त्याला पोलीस कोठडी देण्याची विनंती सरकारी वकील ॲड. विजयसिंह जाधव यांनी युक्तिवादात केली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी व्ही. पी. खंदारे यांनी डंपरचालक तोटरेला २७ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. अपघातानंतर डंपरचालक तोटरेला ताब्यात घेण्यात आले. त्याने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. डंपर कोणाचा आहे, तसेच तो किती वर्षांपासून त्याच्याकडे काम करत आहे. याबाबत सखोल तपास करायचा असल्याने त्याला पोलीस कोठडी देण्याची विनंती पोलिसांनी केली. नगर रस्त्यावरील वाघोली भागात मद्यधुंद डंपरचालकाने पदपथावर झोपलेल्या नऊ जणांना सोमवारी रात्री चिरडले. अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तसेच सहा जण गंभीर जखमी झाले. अपघाताची घटना घडल्यानंतर अजित पवार यांनी वाघोली पोलीस ठाण्यासमोर असलेल्या घटनास्थळाला सोमवारी दुपारी भेट दिली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

### डंपरचालकाला पोलीस कोठडी

अपघाताची घटना दुर्देवी आहे. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची मदत करण्याचा निर्णय घेतला जाईल. अपघातात जखमी झालेल्यांच्या नातेवाईकांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी अमरावती जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करू’. अमरावतीत उद्योगधंदे नाहीत. बेरोजगारीमुळे पुण्यात यावे लागते. डंपर अपघातात ‘होत्याचे नव्हते’ झाले. शासनाने आम्हाला नोकऱ्या उपलब्ध करुन द्याव्यात, अशी विनंती अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांनी केली.वाघोली अपघात प्रकरणात डंपरचालक गजानन तोटरे याला अटक करण्यात आल्यानंतर सोमवारी त्याला शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले.

## शहरवासीयांना हक्काचे छत मिळणार

# सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरांची उभारणी प्रगतिपथावर!

### चिखलीत 'पीएमआरडीए'च्या वतीने 6,500 घरांची होतेय उभारणी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वतीने सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या सदनिका उभारल्या जात आहेत. भोसरी, वाल्हेकरवाडीसह आता चिखली-पेठ क्रमांक १२ येथे साडे सहा हजार सदनिकांची उभारणी केली जात आहेत. दुसऱ्या टप्प्यातील या सदनिकांच्या प्रकल्पाचे बांधकाम प्रगतिपथावर सुरू आहे. आतापर्यंत ३० ते ४० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. या सदनिकादेखील उपलब्ध झाल्यास शहरवासीयांना हक्काचे छत मिळणार आहे.**








पीएमआरडीच्या वतीने विविध विकास प्रकल्प हातात घेण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना परवडतील, अशा सदनिकांची देखील उभारणी केली जात आहे. भोसरी व वाल्हेकरवाडी येथे नुकतीच तेराशे सदनिकांसाठी लॉटरी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये तीन हजार नागरिकांनी अनामत रक्कम देखील भरली आहे.

२० लाखांपासून ते ३५ लाखांपर्यंत ही घरे नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आता नव्याने उर्वरित सदनिका उभारण्यात येत आहेत. पेठ क्रमांक १२ येथील ४० एकर क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ४ हजार ८८३ घरांची उभारणी करण्यात आली आहे. अल्प उत्पन्न गट आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी येथे घरे उभारली आहेत. या प्रकल्पात एकूण ४५ इमारतींचा समावेश आहे.

### काय आहेत सुविधा?

प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्यातील बांधकामाला जुलै २०२३ पासून सुरुवात झाली आहे. प्रकल्पामध्ये ३ बगीचे, १८ आणि २४ मीटरचे अंतर्गत रस्ते, दररोज ४० लाख लिटर पाण्याचा पुनर्वापर करण्याची यंत्रणा, सौरऊर्जेचा वापर, अडीच हजारांपेक्षा अधिक झाडांचे वृक्षारोपण आदी प्रमुख सुविधा असणार आहेत. त्याशिवाय, या गृहप्रकल्पाशेजारी भूखंडावर शाळा, रुग्णालय, क्रीडांगण यासाठी आरक्षणे आहेत.

### अशी असणार रचना

एकूण ६ हजार ४५२ सदनिकांची उभारणी होणार
पर्यावरण विभाग, बांधकाम विभागाची परवानगी
जुलै २०२५ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत
वाहनतळ आणि १४ मजले अशी प्रत्येक इमारतीची रचना
या गृहप्रकल्पाचे एकूण क्षेत्र २९ एकर
प्रकल्पातील एकूण इमारतींची संख्या ४७
उत्पन्न गट आणि सदनिकांची संख्या
वन बीएचके (ईडब्ल्यूएस) - ३३२०
वन आरके (ईडब्ल्यूएस) - ३३२
टू बीएचके (एलआयजी) - १४५६
टू बीएचके (एलआयजी) - १३४४

> पीएमआरडीएच्या वतीने पेठ क्रमांक १२ येथे दुसऱ्या टप्प्यातील ६ हजार ४५२ घरे उभारली जात आहेत. त्याचे काम प्रगतिपथावर आहे. काही इमारतींचे चार ते पाच मजली कामदेखील पूर्ण करण्यात आले आहे. साधारणतः प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यासाठी एक वर्ष तरी लागण्याची अपेक्षा आहे.
>
> -योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए

### म्हाडाप्रमाणे घरांच्या किमती

सध्या या सदनिकांच्या कामाला गती प्राप्त झाली आहे. येत्या वर्षभरात ही कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी माहिती पीएमआरडीए प्रशासनाने दिली आहे. तसेच लॉटरी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर त्याच्या किमती निश्चित केल्या जाणार आहेत. सध्या म्हाडाच्या सदनिकांच्या ज्या किंमती आहेत. त्याच प्रमाणात या किंमती असतील, असे प्रशासनाने सांगितले.

---

## चोरीला गेलेले मोबाईल मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद

### 20 लाख रुपये किंमतीचे चोरीला गेलेले मोबाईल 120 नागरिकांना मिळाले परत; वाकड पोलिसांची कामगिरी

। वाकड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोबइल चोरीला गेला की तो गेला तर परत मिळणार नाही... असा एक समज निर्माण झाला आहे. त्याला तडा देत वाकड पोलिसांनी २० लाख रुपये किंमतीचे मोबाईल शोधून १२० नागरिकांना परत केले आहेत. वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून गहाळ अथवा चोरी झालेले १२० मोबाइल फोन राज्यातून अथवा परराज्यातून परत मिळविलेले फोन संबंधित नागरिकांना परत केल्यामुळे त्यांचे चेहरे आनंदाने खुलले.**



वाकड पोलीस ठाण्यात शनिवारी (दि.२१) नागरिकांना मुद्देमाल परत देण्यात आला. परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतून मोबाइल फोन चोरी, हरवणे तसेच गहाळ होण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी विशेष मोहीम राबवून अशा फोनचा शोध घेण्याबाबत आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, वाकड विभागाचे सहायक आयुक्त सुनील कुराडे यांच्या मागदर्शनाखाली वाकडचे वरिष्ठ निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर यांनी अंमलदार शहाजी धायगुडे, कौंतैय खराडे, प्रमोद गायके यांचे विशेष पथक स्थापन केले. सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटीटी रजिस्टर (सीईआयआर) या पोर्टलव्दारे चोरीला गेलेले, हरवलेले किंवा गहाळ झालेले मोबाइल फोन या विशेष पथकाने ट्रेस केले.

> मागील दोन महिन्यांमध्ये वाकड पोलीस ठाण्याकडून २० लाख रुपये किमतीचे १२० मोबाइल हस्तगत करण्यात आले. यापुढेही अशीच मोहीम राबवून नागरिकांचे गहाळ, चोरी झालेले मोबाइल परत करण्याची कार्यवाही चालू राहील.
>
> –विशाल गायकवाड, पोलीस उपायुक्त

### परराज्यातून मोबाइल परत आणले...

हरवलेले, गहाळ व चोरी झालेले मोबाइल बिहार, कर्नाटक, राजस्थान, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश येथे ट्रेस झाले. कायद्याचा धाक दाखवून मोबाइल परत मागविले. काही मोबाइल पोलिसांनी प्रत्यक्ष जाऊन हस्तगत केले. सदरची कामगिरी विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड डॉ. शशीकांत महानवर, पोलीस सह आयुक्त वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, विशाल गायकवाड, पोलीस उप आयुक्त परि-२, सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त वाकड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वाकड पोलीस ठाणेकडील निवृत्ती कोल्हटकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस हवालदार शहाजी धायगुडे, पोलीस शिपाई कौंतेय खराडे व प्रमोद गायके यांनी केली आहे.

संसदेची सभागृहे हळूहळू कुस्तीचे आखाडे बनत चालली की काय ? अशी शंका येऊ लागली आहे. सत्ताधारी एनडीए आघाडी आणि काँग्रेसप्रणित सर्व विरोधी पक्षांची 'तू..तू..मैं..मैं' नेहमीच सभागृहात पाहायला मिळत होती. पण, गेल्या आठवड्यात मुद्द्यांचा वाद गुद्द्यावर आला, आणि भाजपाचा खासदार जबर जखमी होण्यापर्यंत हा वाद पोहोचला. वाद नेमका कुणामुळे आणि कशामुळे? हा वेगळा मुद्दा होऊ शकतो. पण, हल्ली झालंय काय, संसदेची सभागृहे असोत, नाहीतर विधिमंडळाची चर्चेद्वारे प्रश्न सोडवायचेच नाहीत, अशी ठाम भूमिका विरोधी पक्षांनी घेतली आहे. त्यामुळे सभागृहामध्ये पूर्वी जी चर्चा होत होती, तिला फाटा मिळाला आहे. यावर इलाज म्हणून विरोधी पक्षांनी संसदेच्या बाहेर किंवा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी करून वातावरण बिघडवायचे आणि माध्यमांना हाताशी धरून बातम्या छापून आणायच्या, असा नवा फंडा शोधला आहे.

# खर्गे यांच्या अब्रूची लक्तरं टांगली संसदेच्या वेशीवर !





'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक



वास्तविक, विरोधकांच्या या भूमिकेचा तसूभरही परिणाम सत्ताधाऱ्यांवर होतं नाही. त्यांचे कामकाज सुरू असते, त्यांना हवी ती विधेयके मांडली जातात, त्यांना हवे ते प्रस्ताव संमत होत असतात. पण, विरोधकांची आगपाखड जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम विरोधक अचूक साधतात, हा भाग वेगळा !

## आगामी पाच वर्षे निवांत !

केंद्रामध्ये नरेंद्र मोदी यांचे सरकार किंवा राज्यामधील देवेंद्र फडणवीस यांचे सरकार पूर्ण पाच वर्षे कालावधीत स्थिर राहणार आहेत, हे विरोधकांनाही मान्य आहे. दोघांच्याकडे प्रचंड बहुमत असल्यामुळे विरोधकांचे काहीही चालणार नाही, याची कल्पना सुद्धा त्यांना आहे. त्यामुळे सरकारला सभागृहात 'काउंटर' करता येणार नाही, तेवढी ताकद नाही हे लक्षात आल्यामुळे सभागृह बाहेर 'कामकाज' करण्याचा हा नवा डाव विरोधकांनी रचला आहे. सभागृहाबाहेर एक तर वादावादी होण्याचा प्रश्न नसतो, आणि माध्यमांपुढे स्पष्ट भूमिका मांडता येते, ती अयोग्य काय योग्य हा वेगळा विषय.. आणि सभागृहात असेल तर आता सत्ताधाऱ्यांची बाजू ऐकून घेण्याची मन:स्थिती नसल्यामुळे हाणामाऱ्यापर्यंत मजल पोहचली आहे, ती बाब लोकशाहीसाठी निश्चितच चिंताजनक आहे. कोणत्याही सभागृहातील सदस्य जखमी होणे, नक्कीच भूषणावह नाही.. आज जखमी झाला पण उद्या हेच सदस्य सभागृहात पिस्तुलासारखी हत्यारे आणण्यासही कमी करणार नाहीत, हे लक्षात घ्यायला हवे.

## मोदींकडून खर्गे चारीमुंड्या चीत

सभागृहामध्ये सत्ताधारी बाकांचे प्रमुख आणि विरोधी पक्षांचे प्रमुख यांची खडाजंगी नेहमीच चालते. पण, काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलेल्या आरोपांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या पद्धतीने त्यांचे वाभाडे काढले आणि त्यांच्या अब्रूची लक्तरे संसदेच्या वेशीवर टांगली, तो प्रकार अद्भुत म्हणावा लागेल. हातामध्ये कसलाही संदर्भ किंवा चिठ्ठीचपाटी नसताना पंतप्रधानांनी जो हल्ला चढवला, तो पाहून खर्गे तर नक्कीच अवाक झाले असतील, पण विरोधी बाकांवर स्मशान शांतता पसरली. कित्येक दिवसानंतर मोदींनी अशा प्रकारचा चौफेर शाब्दिक हल्ला चढवला. ते काय म्हणाले, हे या पार्श्वभूमीवर मुद्दाम लक्षात घ्यायला हवे.

## काय म्हणाले नरेंद्र मोदी?

संपूर्ण भारत पंतप्रधान मोदींना मृदुभाषी म्हणून ओळखतो. पण,आपल्यापैकी अनेकांना माहीत नाही, की ते त्यांच्या विरोधकांवर हल्ला करून कसे नामोहरम करतात ? आणि कसे विरोधकांच्या नाकी दम आणतात ! त्याचे एक उत्तम उदाहरण संसदेत पाहायला मिळाले. काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे हे दलित आहेत,सर्वांना माहीत आहे. आपल्या या जातीचा उपयोग ते चपखलपणे नेहमी भाषणात करीत असतात, त्याचे फायदे घेत असतात. संसदेत काय झाले.. एका आक्रमक सैनिकाच्या आवेशात त्यांनी अचानक एक प्रश्न उपस्थित केला. अक्षरशः जोरदार आवाजात किंचाळत, हातवारे करीत मोदींना प्रश्न विचारला.. आमच्यासारख्या दलित जनतेसाठी तुम्ही काय केलेत ? तुम्ही प्रत्येक दलित कुटुंबाला किमान एक टक्का जमीन द्यावी, आम्हाला जगण्याचा हक्क आहे, आम्ही जगू नये का ? लोकसभेत स्मशान शांतता पसरली.

## मोदींचे आक्रमण आणि हतबल खर्गे

अचानक आलेल्या आक्रमक प्रश्नामुळे सभागृहात अधिकारी भांबावले..माहिती तयार नव्हती.. माहिती संकलित करून एक तासानंतर उत्तर देण्यात येईल, असा अभिप्रायाचा कागद अधिकाऱ्यांनी मोदींच्या डेस्कवर दिला. मोदींनी कागदाकडे न पाहताच कागद बाजूला सरकवला.. मोदींच्या चेहऱ्याचे भाव बदलत होते, सर्वजण खुर्चीवर गोठल्यासारखे बसले होते. सभागृहाच्या नजरा मोदींवर खिळल्या होत्या.. श्वास थांबले होते.. मोदींनी थोडा वेळ घेतला आणि आपल्या जागेवरून उठले, शाब्दिक हल्ला चढवण्यासाठी !

त्यांनी शांतपणे खर्गे यांना विचारले, 'तुम्ही स्वतः दलित नाही कां ?' तुमच्या ताब्यात किती जमीन आहे,माहीत आहे का? तुम्हाला माहीत नसेल, आठवत नसेल तर मी उघड करून सांगतो.. खर्गे संकोचत असल्याचे पाहून मोदींनी आवाज वाढवला..'तुम्हीं सांगणार नसाल तर ठीक आहे ; मी स्वतःच सांगतो !

## खर्गे यांच्या मालमत्तेची जंत्रीच

तुमचे बंगळुरूच्या बन्नरघाटा परिसरात ५०० कोटी रुपयांचे व्यापारी संकुल आहे. चिकमंगलूर येथे ३०० एकर क्षेत्रफळ असलेली कॉफी इस्टेट आहे. त्या ठिकाणीच आहे तुमचा सुमारे 50 कोटींचा बंगला ! केंगेरी येथे ४० कोटी रुपयांचे फार्म हाऊस ! रामय्या कॉलेजजवळ २५ कोटींची इमारत ! बंगळुरू येथे आर. टी. नगर मध्ये आणखी ११० कोटींचा एक बंगला आहे. बेल्लारी रोड येथे 17 एकर शेतजमीन आहे. याशिवाय, इंदिरानगर बंगलोरमधील तीन मजली इमारत! बंगळुरू मध्ये सदाशिवनगरमध्ये दोन बंगले लक्षात आहे ना खर्गेसाहेब ! मोदी पुढे बोलतच राहिले..वरील व्यतिरिक्त मी म्हैसूर येथे असलेल्या तुमच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावरील मालमत्तांची यादी सांगू का?गुलबर्गा, चेन्नई, गोवा, पुणे, नागपूर, मुंबई आणि दिल्ली ? एक ना दोन खर्गे यांच्या मालमत्तेची यादी वाढतच राहिली. मोदींनी सादर केलेली जंत्री, ती सुद्धा हातात चिट्ठी किंवा कागद न घेता.. संपूर्ण सभागृह स्तब्ध झाले !

खर्गे यांनी अचानक विचारलेला प्रश्न..ज्याचे उत्तर सरकारकडे तयार नसेल, असा अंदाज असलेले मल्लिकार्जुन खर्गे हतबल झाले. त्यांचा चेहरा फिका पडला.. फक्त मान खाली घालून घाम पुसत राहिले ! मोदी पुन्हा कडाडले,'जर एक टक्का जमीन दलितांना दिली, तर वरील सर्व व्यक्तींना जमीन देण्याची गरज नाही का मोदींकडे सर्वांच्या कुंडल्या असल्याची पुन्हा एकदा खात्री पटली..काँग्रेसच्या गोटात दफनभूमी सारखी शांतता होती. काँग्रेसचा एकही सहकारी तोंड उघडू शकला नाही. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी टाळ्या व डेस्कवर आवाज काढण्यास सुरुवात केली आणि तो आवाज संपूर्ण संसदेत घुमू लागला. काँग्रेस पक्षाची पूर्ण जिरली होती. नरेंद्र मोदी यांच्या या अभ्यासू वृत्तीमुळे आज ते संपूर्ण जगापुढे एक आदर्श विश्वगुरू म्हणून येत आहेत. समोर कुठला संदर्भही नसताना केवळ अभ्यासाच्या द्वारे त्यांनी सर्व प्रतिस्पर्ध्यांवर नेहमीच मात केली आहे, त्याचे एक छोटेसे उदाहरण मल्लिकार्जुन खर्गे यांच्या रूपाने त्यांनी संपूर्ण देशाला दाखवून दिले आहे. या धक्क्यातून काँग्रेस पक्ष सावरायला बरेच दिवस जाणार आहेत हे मात्र निश्चित!न

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा!

## 1,21,471 रुग्णांना दाखल करून करण्यात आले उपचार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या (कॅग) च्या अहवालामध्ये राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे नमूद करत अनेक गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत. तसेच आरोग्य व्यवस्थेवर राज्याच्या अर्थसंकल्पाच्या ८ टक्के निधी खर्च होणे अपेक्षित असताना केवळ ४.९१ टक्के एवढाच खर्च झाल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे.**



या अहवालाचा कालावधी २०१६-१७ ते २०२१-२२ असा असून कॅगच्या लेखापरीक्षकांचा अहवाल विधिमंडळात सादर करण्यात आला होता. आरोग्य विभागाने मागील दोन वर्षात मोठ्या प्रमाणात डॉक्टरांची तसेच परिचारिकांसह आवश्यक रिक्त पदे मोठ्या प्रमाणात भरली आहेत. रुग्णांना शंभर टक्के मोफत उपचार मिळत असल्यामुळे मागील दोन वर्षात दोन कोटींहून अधिक बाह्यरुग्ण वाढल्याचे नमूद करण्यात आले आहे. २०२३-२४ मध्ये तब्बल ४ कोटी ७७ लाख ७८४३ रुग्णांवर बाह्यरुग्ण विभागात उपचार करण्यात आले तर तब्बल १,२१,४७१ रुग्णांना दाखल करून उपचार करण्यात आले अल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. कॅगच्या अहवालात घेण्यात आलेल्या आक्षेपांपैकी अनेक गोष्टी आरोग्य विभागाने जवळपास पूर्ण केल्या आहेत तर अनेक गोष्टींची कामे सुरू असल्याचे आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी सांगितले. आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाचा सर्वंकष विकासाचा आराखडाही तयार करण्याचे काम सुरु असून महाराष्ट्रातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोचविण्याचे काम आम्ही करत असल्यचे डॉ अंबाडेकर म्हणाले. आरोग्यसेवा पूर्णपणे मोफत करतानाच रुग्णोपचार अत्याधुनिक व प्रभावीसेवा देण्याचे काम करण्यात येत असून या अंतर्गत शंभर खाटांच्या रुग्णालयात सिटी स्कॅन सेवा सुरु करण्यात आली आहे तसेच ग्रामीण रुग्णालयांपर्यंत एक्स-रे मशिन बसविण्यात आले आहेत. जिल्हा रुग्णालयात एमआरआय सेवा देण्यात येणार आहे. तसेच रुग्णवाहिकांसेवा बळकटीकरणापासून आवश्यकतेनुसार अत्यधुनिक रुग्णवाहिकांची व्यवस्था दुप्पट करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील आरोग्य सेवांचे बळकटीकरण, जिल्हा रुग्णालयांचे अत्याधुनिकीकरण, ग्रामीण रुग्णालयांचे उपजिल्हा रुग्णालयांमध्ये रुपांतर करून रुग्णालयीन खाटांची संख्या वाढविण्याचे काम तसेच नवीन रुग्णालयांच्या बांधकामांची निर्मिती, आरोग्यवर्धीनी केंद्रांचा विस्तार, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याच्या माध्यमातून लक्षावधी रुग्णांवर दररोज होणारे उपचार याशिवाय आदिवासी भागात २८१ भरारी पथकांच्या माध्यमातून पाड्यापाड्यांवर जाऊन प्रत्यक्ष आरोग्यसेवा देणे, आश्रमशाळांसाठी आरोग्य पथके, आशा सेविकांच्या माध्यमातून घरोघर जाऊन आरोग्य विषयक विविध गोष्टींचे सर्वेक्षण तसेच प्रत्यक्ष मदत करण्यासह अनेक उपक्रम राबविण्यात येत असतात. यासाठी आरोग्य विभागाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील डॉक्टरांपासून विविध स्तरांवरील डॉक्टरांना परिचारिकांना निरंतर प्रशक्षण देण्याचे कामही नियमितपणे केले जात असते. आरोग्यसेवा अधिक प्रभावीपणे देता यासाठी कंत्राटी विशेषज्ञांची भरती वेळोवेळी केली जाते. तसेच ३००० ते ५००० लोकसंख्येसाठी संबंधित ठिकाणी सीएचओ तसेच आयुष डॉक्टरांचीही भरती करण्यात आल्याचे डॉ. अंबाडेकर यांनी सांगितले. कॅगचा अहवाल हा २०१६-१७ ते २०२१-२२ या काळातील असून त्यानंतर मोठ्याप्रमाणात डॉक्टरांची भरती करण्यात आली आहे. १४०० डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली असून अजून ८०० डॉक्टरांची भरती करण्याची प्रक्रिया सुरु आहे. याशिवाय वर्ग 'क' व 'ड'च्या १० हजार पदांची जाहिरात कढण्यात आली होती त्यापैकी ८००० लोकांची भरती करण्यात आली असून उर्वरित लोकांचीही लवकरच भरती केली जाणार आहे. केंद्र सरकारच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांची कटाक्षाने अंमलबजावणी केली जात आहे. या अहवालाचा कालावधी २०१६-१७ ते २०२१-२२ असा असून कॅगच्या लेखापरीक्षकांचा अहवाल विधिमंडळात सादर करण्यात आला होता. आरोग्य विभागाने मागील दोन वर्षात मोठ्या प्रमाणात डॉक्टरांची तसेच परिचारिकांसह आवश्यक रिक्त पदे मोठ्या प्रमाणात भरली आहेत.

### मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी

रुग्णांना शंभर टक्के मोफत उपचार मिळत असल्यामुळे मागील दोन वर्षात दोन कोटींहून अधिक बाह्यरुग्ण वाढल्याचे नमूद करण्यात आले आहे.आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. कॅगच्या अहवालात घेण्यात आलेल्या आक्षेपांपैकी अनेक गोष्टी आरोग्य विभागाने जवळपास पूर्ण केल्या आहेत तर अनेक गोष्टींची कामे सुरू असल्याचे आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी सांगितले. आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाचा सर्वंकष विकासाचा आराखडाही तयार करण्याचे काम सुरु असून महाराष्ट्रातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोचविण्याचे काम आम्ही करत असल्यचे डॉ अंबाडेकर म्हणाले.

# मी शब्दांत शूर, पण सुरात असूर : फडणवीस

## शंकर महादेवन यांनी फडणवीस यांना गाण्याची विनंती केली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शतकापूर्वी रंगभूमीवर आलेले आणि रसिकमनांत विराजमान झालेले 'संगीत मानापमान' हे कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे नाटक आणि त्यातील गाजलेली नाट्यपदं आजही रसिकांच्या मनात घर करून आहेत. याच अभिजात नाटकावरून प्रेरित असलेल्या 'संगीत मानापमान' या चित्रपटातही १८ प्रतिभावंत गायकांनी गायलेल्या १४ गाण्यांचा आनंद प्रेक्षकांना घेता येणार आहे.**

या चित्रपटाचा आज ट्रेलर लॉन्च करण्यात आला. यावेळी खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्यांना गायक शंकर महादेवन यांनी गाण्याची विनंती केली.

मात्र त्यांनी शब्दांची कोटी करत गाण्यास नकार दिला. प्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गाण्याची विनंती केली. यावेळी अभिनेता सुबोध भावे यांनी त्यांच्या हातात माईकही दिला. मात्र, माईक हातात घेतल्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मी पहिल्यांदा स्पष्ट करू इच्छितो की मी शब्दांत शूर आहे, पण सुरात असूर आहे. लोकांचा गैरसमज होतो. पण माझी बायको



गाते, मला गाता येत नाही." देवेंद्र फडणवीसांनी मिश्किल भाष्य केल्यावर सुबोध भावे यांनी त्यांना फक्त गणपती बाप्पा मोरया बोलण्याची विनंती केली.दिग्गज संगीतकार शंकर-एहसान-लॉय यांनी या चित्रपटासाठी एकूण १४ गाणी संगीतबद्ध केली आहेत. तर स्वत: शंकर महादेवन यांच्यासह सोनू निगम, राहुल देशपांडे, महेश काळे, अवधूत गुप्ते, बेला शेंडे, प्रियांका बर्वे, आर्या आंबेकर, प्रतिभा सिंग बघेल, जसराज जोशी, आनंद भाटे, शौनक अभिषेकी, सावनी रवींद्र, हृषीकेश बडवे, अस्मिता चिंचाळकर, कृष्णा बोंगाणे, शिवम महादेवन आणि श्रीनिधी घटाटे अशा १८ गायक-गायिकांनी ही गाणी गायली आहेत. अभिमानाची गोष्ट म्हणजे यातले सात गायक हे राष्ट्रीय पुरस्कार विजेते गायक आहेत.जिओ स्टुडिओजच्या निमित्ताने 'संगीत मानापमान' चित्रपटाला मोठं व्यासपीठ मिळालं असून 'सारेगामा'सारख्या मोठ्या संगीत कंपनीच्या माध्यमातून ही गाणी अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

### बायको गाते, मला गाता येत नाही

संगीत मानापमान'चे दिग्दर्शन आणि त्यातली धैर्यधराची मुख्य भूमिका अशा दोन्ही धुरा अभिनेता सुबोध भावे यांनी सांभाळल्या आहेत. सुबोधसह या चित्रपटात सुमित राघवन, वैदेही परशुरामी, उपेंद्र लिमये, नीना कुलकर्णी, निवेदिता सराफ, शैलेश दातार, अर्चना निपाणकर आदी कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. पटकथा आणि कथाविस्तार शिरीष गोपाळ देशपांडे आणि ऊर्जा देशपांडे यांचे आहेत, तर अतिरिक्त पटकथा आणि संवाद पटकथा लेखन प्राजक्त देशमुख यांनी केले आहे. संगीतमय नजराणा असलेला 'संगीत मानापमान' हा चित्रपट १० जानेवारी २०२५ रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

# सरकारने 'नो डिटेन्शन पॉलिसी' संपवली!

## अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना 2 महिन्यांत फेरपरीक्षेची संधी दिली जाणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इयत्ता 5 वी आणि 8 वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे पुढच्या वर्गात ढकण्यात येणार नाही. केंद्र सरकारने सोमवारी 'नो डिटेन्शन पॉलिसी' संपवली आहे. यापूर्वी या नियमानुसार नापास झालेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणीत बढती दिली जात होती.**



सरकारच्या नव्या अधिसूचनेनुसार, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना 2 महिन्यांत फेरपरीक्षेची संधी दिली जाणार आहे. जर ते पुन्हा नापास झाले तर त्यांना पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार नाही, पण ते ज्या वर्गात शिकत होते त्याच वर्गात पुन्हा अभ्यास करावा लागेल. आठवीपर्यंतच्या अशा मुलांना शाळेतून काढून टाकले जाणार नाही, अशी तरतूदही सरकारने केली आहे. केंद्र सरकारच्या नव्या धोरणाचा परिणाम केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये आणि सैनिक शाळांसह 3 हजारांहून अधिक शाळांवर होणार आहे. 16 राज्ये आणि 2 केंद्रशासित प्रदेशांनी (दिल्ली आणि पुद्दुचेरी) आधीच नो-डिटेंशन धोरण रद्द केले आहे. शिक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, शालेय शिक्षण हा राज्याचा विषय आहे, त्यामुळे राज्ये या संदर्भात स्वतःहून निर्णय घेऊ शकतात. 2010-11 पासून इयत्ता 8 वी पर्यंतच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होण्याच्या तरतुदीवर बंदी घालण्यात आली होती. म्हणजे मुले नापास होऊनही त्यांना पुढच्या वर्गात बढती मिळत होती, पण त्यामुळे शिक्षणाचा स्तर हळूहळू घसरत असल्याचे दिसून आले. ज्याचा परिणाम दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांवर होऊ लागला. या विषयावर बराच वेळ विचारविनिमय केल्यानंतर नियमात बदल करण्यात आला. जुलै 2018 मध्ये शिक्षणाच्या अधिकारात सुधारणा करणारे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले. यामध्ये शाळांमध्ये लागू करण्यात आलेले 'नो डिटेन्शन पॉलिसी' रद्द करण्याची चर्चा होती. त्यानुसार पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या नियमित परीक्षा घेण्याची मागणी करण्यात आली होती. यासोबतच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची दोन महिन्यांत फेरपरीक्षा घेण्याचीही चर्चा होती. 2019 मध्ये हे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले. यानंतर, राज्य सरकारांना 'नो डिटेन्शन पॉलिसी' काढून टाकण्याचा किंवा तो लागू ठेवण्याचा अधिकार होता. म्हणजे पाचवी आणि आठवीमध्ये नापास झाल्यास त्यांना बढती द्यायची की पुन्हा त्याच वर्गात ठेवायचे हे राज्य सरकार ठरवू शकले असते.सरकारच्या नव्या अधिसूचनेनुसार, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना 2 महिन्यांत फेरपरीक्षेची संधी दिली जाणार आहे. जर ते पुन्हा नापास झाले तर त्यांना पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार नाही, पण ते ज्या वर्गात शिकत होते त्याच वर्गात पुन्हा अभ्यास करावा लागेल. आठवीपर्यंतच्या अशा मुलांना शाळेतून काढून टाकले जाणार नाही, अशी तरतूदही सरकारने केली आहे. केंद्र सरकारच्या नव्या धोरणाचा परिणाम केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये आणि सैनिक शाळांसह 3 हजारांहून अधिक शाळांवर होणार आहे. 16 राज्ये आणि 2 केंद्रशासित प्रदेशांनी (दिल्ली आणि पुद्दुचेरी) आधीच नो-डिटेंशन धोरण रद्द केले आहे. शिक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, शालेय शिक्षण हा राज्याचा विषय आहे, त्यामुळे राज्ये या संदर्भात स्वतःहून निर्णय घेऊ शकतात. 2010-11 पासून इयत्ता 8 वी पर्यंतच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होण्याच्या तरतुदीवर बंदी घालण्यात आली होती. म्हणजे मुले नापास होऊनही त्यांना पुढच्या वर्गात बढती मिळत होती, पण त्यामुळे शिक्षणाचा स्तर हळूहळू घसरत असल्याचे दिसून आले. ज्याचा परिणाम दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांवर होऊ लागला. या विषयावर बराच वेळ विचारविनिमय केल्यानंतर नियमात बदल करण्यात आला. जुलै 2018 मध्ये शिक्षणाच्या अधिकारात सुधारणा करणारे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले. यामध्ये शाळांमध्ये लागू करण्यात आलेले 'नो डिटेन्शन पॉलिसी' रद्द करण्याची चर्चा होती. त्यानुसार पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या नियमित परीक्षा घेण्याची मागणी करण्यात आली होती.

### नो-डिटेन्शन पॉलिसी काय आहे?

शिक्षण हक्क कायद्याच्या नो-डिटेंशन धोरणानुसार, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला नापास करता येत नाही किंवा शाळेतून काढून टाकता येत नाही. परीक्षेत अनुत्तीर्ण होऊनही आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्गात बढती देण्याची तरतूद आहे.यासोबतच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची दोन महिन्यांत फेरपरीक्षा घेण्याचीही चर्चा होती. 2019 मध्ये हे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले. यानंतर, राज्य सरकारांना 'नो डिटेन्शन पॉलिसी' काढून टाकण्याचा किंवा तो लागू ठेवण्याचा अधिकार होता. म्हणजे पाचवी आणि आठवीमध्ये नापास झाल्यास त्यांना बढती द्यायची की पुन्हा त्याच वर्गात ठेवायचे हे राज्य सरकार ठरवू शकले असते.मुले नापास होऊनही त्यांना पुढच्या वर्गात बढती मिळत होती, पण त्यामुळे शिक्षणाचा स्तर हळूहळू घसरत असल्याचे दिसून आले. ज्याचा परिणाम दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांवर होऊ लागला.

# दलित आहे म्हणून सोमनाथ सूर्यवंशीची हत्या

## सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टम रिपोर्ट मी पाहिला : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टम रिपोर्ट मी पाहिला. त्यावरून स्पष्ट आहे की सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू हा शंभर टक्के पोलीस कस्टडीमध्ये मारहाणीमुळे झाला आहे. पोलिसांनी त्यांची हत्या केली आहे आणि मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनादरम्यान खोटी माहिती दिली आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केला आहे. ते आज परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबीयांचं सांत्वन करण्यासाठी त्यांच्या भेटीला पोहोचले होते.**



सोमनाथ सूर्यवंशी हा दलित समाजाचा होता आणि तो संविधानाची रक्षा करत होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा ही संविधान संपविण्याची आहे आणि त्यामुळेच सोमनाथ सूर्यवंशी या दलित युवकाचा खून केला असल्याची स्पष्टोक्ती खासदार राहुल गांधी यांनी दिली आहे. परभणी येथे १० डिसेंबर रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाली. त्यानंतर ११ डिसेंबर रोजी परभणी बंद पुकारण्यात आला होता. पण बंद दरम्यान दगडफेक लाठी चार जाळपोळ ची घटना घडली आणि त्यामध्ये तब्बल ५० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. ५० जणांपैकीच असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी याचा न्यायालयीन कोठडी दरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर मात्र पोलीस आणि सरकार विरुद्ध प्रचंड आक्रोश निर्माण झाला आहे. त्या दरम्यान आज लोकसभेतील विरोधी पक्ष नेते काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी सोमनाथ सूर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आहे. पुढे बोलताना खासदार राहुल गांधी म्हणाले की, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा संविधान विरोधी आहे. संविधानाची रक्षा करणाऱ्यांना ते त्रास देतात. सोमनाथ सूर्यवंशी देखील हा संविधानाची रक्षा करणारा युवक होता. म्हणूनच त्याचा खून करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे आणि जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. राज्य सरकारने जी काही मदत आणि जो काही निर्णय जाहीर केला आहे त्याविषयी आम्ही संतुष्ट नाहीत.

### फाशीची शिक्षा झाली पाहिजे

राहुल गांधी यांनी मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर त्यांच्याकडून प्रतिक्रिया जाणून घेतली असता सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई वत्सलाबाई सूर्यवंशी म्हणाल्या की राहुल गांधी आम्हाला भेटले. जोपर्यंत माझा मुलगा सोमनाथ सूर्यवंशी याला मारहाण करून मारण्यात आले त्या सर्व आरोपींना जोपर्यंत फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत आम्हाला न्याय मिळणार नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे आणि दोषी पोलीस अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे.

# मिस्टर अँड मिसेस नेनेंचा डॅशिंग लूक!

आपल्या सुंदर हास्याने, सौंदर्याने आणि अभिनयाने लाखो चाहत्यांना भुरळ घालणारी बॉलीवूडची 'धकधक गर्ल' म्हणून माधुरी दीक्षितला ओळखलं जातं. १९८४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अबोध' चित्रपटातून अभिनेत्रीने मनोरंजन विश्वात पदार्पण केलं होतं. माधुरीच्या सुरुवातीच्या काही चित्रपटांना म्हणावं तसं यश मिळालं नाही. पण, त्यानंतर आलेल्या 'तेजाब'मुळे अभिनेत्री रातोरात सुपरस्टार झाली. आज वयाच्या ५७ व्या वर्षी देखील माधुरी तेवढीच फिट आणि सुंदर दिसते. नुकतीच अभिनेत्रीने आपल्या पतीसह बीकेसी NMACC मधल्या आर्ट्स कॅफे लॉन्चला उपस्थिती लावली होती. नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटरच्या (NMACC) तिसऱ्या मजल्यावर असलेला NMACC आर्ट्स कॅफे येत्या २९ डिसेंबरपासून सर्वसामान्य लोकांसाठी खुला होणार आहे. या कॅफेच्या उद्घाटन सोहळ्याला बॉलीवूडच्या अनेक सेलिब्रिटींनी उपस्थिती लावली होती. अंबानी कुटुंबीय, अन्यया व तिची आई भावना पांडे, जान्हवी कपूर, शाहरुख खान-गौरी, विद्या बालन, अर्जुन कपूर, करण जोहर, सुहाना खान, शाहिद कपूर व मीरा राजपूत यांसह माधुरी दीक्षित ( MADHURI DIXIT ) व तिचे पती डॉ. श्रीराम नेने यांनी देखील या सोहळ्याला उपस्थिती लावली होती.मिस्टर अँड मिसेस नेनेंचा या आर्ट्स कॅफे लॉन्च सोहळ्यात डॅशिंग लूक पाहायला मिळाला. माधुरीने ROSE गोल्ड रंगाचा ऑफ शोल्डर सुंदर असा वनपीस ड्रेस घातला होता.

# अभिनयाची चर्चा आजही होताना




भारतीय चित्रपटसृष्टीत अशा अनेक दिग्गज अभिनेत्री आहेत, ज्यांनी अनेक भाषांमध्ये काम केले आहे. मधुबाला, सावित्री, मीना कुमारी आणि नर्गिसपासून ते शबाना आझमी, स्मिता पाटील, रेखापर्यंत अशा अनेक अभिनेत्री आहेत, ज्यांच्या अभिनयाची चर्चा आजही होताना दिसते. या सर्वात श्रीदेवी(SRIDEVI) यांचे नाव अग्रस्थानी येते. त्यांनी त्यांच्या कामातून, अभिनयातून, चित्रपटांप्रति त्यांच्या समर्पणातून प्रेक्षकांच्या, सहकलाकारांच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली. आजही त्यांच्याबद्दल आदराने बोलले जाते.श्रीदेवी यांनी दिग्दर्शक पंकज पाराशर यांच्याबरोबर दोन चित्रपटांत काम केले होते. १९८९ ला प्रदर्शित झालेल्या 'चालबाज' व २००४ साली प्रदर्शित झालेल्या 'मेरे बीबी का जवाब नहीं' या चित्रपटात श्रीदेवीने काम केले होते.

# मी सिगारेट ओढली




अभिनेता सैफ अली खान याची लेक आणि अभिनेत्री सारा अली खान हिने अभिनेता सुशांत सिंह राजपूत याच्यासोबत बॉलिवूड करियरला सुरुवात केली. पहिल्याच सिनेमातून सारा, सुशांत याच्यासोबत दिसली. सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर दोघांना अनेक ठिकाणी एकत्र स्पॉट देखील करण्यात आलं. शिवाय दोघांच्या रिलेशनशिपच्या चर्चांनी देखील जोर धरला. पण अभिनेत्याच्या अचनाक निधनानंतर चाहत्यांना देखील मोठा धक्का बसला.सुशांत सिंह राजपूत हत्या प्रकरणात एनसीबीने सारा अली खान हिला चौकशीसाठी बोलावलं होतं. तेव्हा अभिनेत्रीने मोठा खुलासा केला होता. रिपोर्टनुसार, सारा हिने सुशांत डेट करत असल्याचं सांगितलं होतं. पण अभिनेत्रीने त्यांच्या ब्रेकअपचं कारण देखील सांगितलं...सारा हिने दिलेल्या माहितीनुसार, नात्यामध्ये सुशांत कधीच निष्ठावंत नव्हता. सारा म्हणाली होती, 'सुशांत प्रचंड पजेसिव होता. माझ्या आगामी सिनेमा सुशांतला कास्ट करा... असं दिग्दर्शकांना जाऊन सांग. असं तो सतत म्हणायचा...' याचदरम्यान, सारा हिने ड्रग्स सेवनाबद्दल देखील मोठं वक्तव्य केलं होतं. ' मी सिगारेट ओढली होती...' अशी कबुली साराने चौकशीमध्ये दिली होती. लोनावळा याठिकाणी सुशांत सिंह राजपूत याचा एक फार्महाऊस आहे. अभिनेत्याच्या निधनानंतर फार्महाऊसच्या केअरटेकरने IANS ला महत्त्वाची माहिती दिली होती. केअरटेकरने दिलेल्या माहितीनुसार, अभिनेता 2019 मध्ये सारा हिला प्रपोज देखील करणार होता.

# इथल्या सुविधां बद्दल काय बोलावं?

प्रसिद्ध पार्श्वगायिका मोनाली ठाकूरने २२ डिसेंबर २०२४ रोजी वाराणसीत तिचा कॉन्सर्ट अर्ध्यावर सोडला. या कॉन्सर्टचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यात मोनालीने कॉन्सर्ट अर्ध्यावर सोडल्याबद्दल चाहत्यांची माफी मागितली आहे. याच व्हिडीओत मोनालीने कॉन्सर्टमध्ये पायाभूत सुविधा नसल्याचे कारण दिले. वाराणसीमधील या कार्यक्रमाचे आयोजक आणि व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे तसेच अपुऱ्या पायाभूत सुविधा यामुळे तिने कार्यक्रमातून माघार घेतली असे मोनालीने व्हिडीओमध्ये सांगितले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये मोनालीने चाहत्यांशी संवाद साधला आहे. ती व्हिडीओत म्हणते,"माझ्या टीमला आणि मला इथं परफॉर्म करायचं होतं, यासाठी आम्ही खूप उत्सुक होतो, इथल्या पायाभूत सुविधांबद्दल काय बोलावं? ती जबाबदारी इथल्या व्यवस्थापकांची होती. पैसे चोरी करण्यासाठी यांनी या स्टेजवर हे काय केलं आहे हे मी समजावून सांगू शकत नाही." असे तिने नमूद केले.मोनाली ठाकूरने पुढे सांगितले, "मी वारंवार सांगत होते की, अशा परिस्थितीत मला माझा पाय मुरगळण्याचा धोका आहे. माझ्या डान्सर्सनी मला शांत राहण्याचा सल्ला दिला, पण सर्व गोंधळ होता. आम्ही याही परिस्थितीत आम्ही तुमचं मनोरंजन करण्यासाठी प्रयत्न करत होतो. कारण तुम्ही इथं माझ्यासाठी येता, आणि मी तुम्हाला यासाठी उत्तर देणे अपेक्षित आहे, हे मला माहीत आहे.



# सलमान खानचा जवळचा मित्र झाला बाबा




सिनेविश्वातील एका जोडप्याने आनंदाची बातमी शेअर केली आहे. प्रसिद्ध कोरिओग्राफर व सलमान खानचा मित्र मुदस्सर खान बाबा झाला आहे. त्याने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट केली आहे. मुदस्सरची पत्नी रिया किशनचंदानीने एका गोंडस मुलीला जन्म दिला आहे. लग्नानंतर वर्षभराने या जोडप्याच्या आयुष्यात एका चिमुकल्या सदस्याचं आगमन झालं आहे. प्रसिद्ध कोरिओग्राफर मुदस्सर खानने ३ डिसेंबर २०२३ रोजी गर्लफ्रेंड रिया किशनचंदानीशी आंतरधर्मीय लग्न केले होते. आता वर्षभराने हे दोघे आई-बाबा झाले आहेत. रियाने एका गोंडस मुलीला जन्म दिला आहे. मुदस्सरने आज (२३ डिसेंबरला) एक व्हिडीओ शेअर केला आहे. "सर्व प्रार्थना आणि आशीर्वादांसाठी मी आम्हा दोघांचे कुटुंब आणि मित्रांचे आभार मानतो," असं कॅप्शन देऊन मुदस्सरने एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत त्याने लेकीच्या जन्माची माहिती दिली. मुदस्सरने डॉक्टरांचे देखील आभार मानले आहेत.मुदस्सर खान सलमान खानचा खास मित्र आहे. मुदस्सर व रियाच्या लग्नाला सलमानने हजेरी लावली होती. मुदस्सर खानला 'डान्स इंडिया डान्स' या रिॲलिटी शोमधून ओळख मिळाली. या रिॲलिटी शोचे अनेक सीझन त्याने जज केले होते. रिॲलिटी शो व्यतिरिक्त मुदस्सर खानने अनेक चित्रपटांसाठी नृत्यदिग्दर्शनही केले आहे. या कोरिओग्राफरचे सलमान खानशी खास कनेक्शन आहे. मुदस्सरने सलमान खानच्या 'दबंग', 'रेडी', 'बॉडीगार्ड', 'प्रेम रतन धन पायो', 'राधे' आणि 'अंतिम' सारख्या अनेक चित्रपटांमध्ये गाणी कोरिओग्राफ केली आहेत.रिया किशनचंदानी 'स्प्लिट्सविला' आणि 'मिका दी वोटी' या रिॲलिटी शोमध्ये झळकली होती. रिया एक अभिनेत्री आणि मॉडेल आहे. 'मैं होना की नहीं होना', 'स्वॅग दी सवारी' आणि 'तेनू दस्या' यांसारख्या सिनेमांमध्येही तिने काम केलं आहे.सिनेविश्वातील एका जोडप्याने आनंदाची बातमी शेअर केली आहे.

# अय्यरची 44 धावांची अप्रतिम खेळी !

## नवव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरत शानदार फलंदाजी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबई संघाचे नेतृत्त्व करत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या श्रेयस अय्यरने पुन्हा एकदा आपल्या कामगिरीने लक्ष वेधलं आहे. श्रेयसने आपल्या उत्कृष्ट फलंदाजीच्या जोरावर विजय हजारे ट्रॉफीमध्ये संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. श्रेयस अय्यर विजय हजारे ट्रॉफीमध्येही आपल्या संघाचे नेतृत्व करत आहे. अलीकडेच त्याच्या नेतृत्वाखाली मुंबईने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीही जिंकली. चॅम्पियन्स ट्रॉफी जवळ आल्याने श्रेयसची ही खेळी आणखी महत्त्वाची ठरली आहे.**





विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबई आणि अहमदाबाद या संघांमध्ये अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवला गेला.प्रथम फलंदाजी करण्यासाठी उतरलेल्या हैदराबाद संघाने आपले सर्व विकेट गमावत ३८.१ षटकांत केवळ १६९ धावांची माफक धावसंख्या उभारली. म्हणजे मुंबईसमोर कमी धावसंख्येचे आव्हान होते. त्यामुळे श्रेयस अय्यरने काही प्रयोग करून नवीन खेळाडूंना प्रथम खेळण्याची संधी दिली.अंगक्रिश रघुवंशी आणि आयुष म्हात्रेची जोडी सलामीला उतरली आणि दोघेही अनुक्रमे १९ आणि २८ धावा करत बाद झाले. हार्दिक तामोरे आणि शार्दुल ठाकूर शून्यावर बाद झाले. तर सय्यद मुश्ताक अली अंतिम सामन्याचे हिरो सूर्यांश शेडगे आणि अथर्व अंकोलेकरही स्वस्तात बाद झाले. यानंतर तनुष कोटियनने ३९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.सूर्यकुमार यादव आठव्या क्रमांकावर फलंदाजीला आला.तो २३ चेंडूत केवळ १८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. या खेळीत सूर्याने दोन चौकार आणि एक षटकार लगावला. यानंतर कर्णधार श्रेयस अय्यर नवव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरला. जेव्हा सूर्यकुमार यादव बाद झाला तेव्हा संघाची धावसंख्या १०५ धावा होती, याचा अर्थ विजयासाठी मुंबईला अजून बऱ्याच धावांची गरज होती तर चेंडूही बाकी होते. तेव्हा श्रेयस अय्यरने जबाबदारी स्वीकारली आणि आपल्या संघाला विजयाकडे नेले. श्रेयस अय्यरने २० चेंडूत ४४ धावांची अप्रतिम खेळी केली. यादरम्यान त्याने चार चौकार आणि तीन षटकार लगावत प्रतिस्पर्धी संघाचा पराभव केला. नुकत्याच झालेल्या सय्यद मुश्ताक अली टी-20 स्पर्धेतही श्रेयस अय्यरने उत्कृष्ट खेळी करत संघाचे उत्तम नेतृत्त्व करत जेतेपद पटकावून दिले.सध्या भारतीय संघाबाहेर असलेल्या श्रेयस अय्यरने या वर्षी ऑगस्टमध्ये श्रीलंकेविरुद्ध भारताकडून शेवटचा एकदिवसीय सामना खेळला होता. श्रेयस अय्यरला टी-२० आणि कसोटी संघातही स्थान मिळू शकले नाही, पण तो एकदिवसीय संघात पुनरागमन करण्याची शक्यता आहे. आगामी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळलेल्या तुफानी खेळींची टीम इंडियातील निवडीसाठी महत्त्वाची भूमिका ठरेल.विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबई आणि अहमदाबाद या संघांमध्ये अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवला गेला.प्रथम फलंदाजी करण्यासाठी उतरलेल्या हैदराबाद संघाने आपले सर्व विकेट गमावत ३८.१ षटकांत केवळ १६९ धावांची माफक धावसंख्या उभारली. म्हणजे मुंबईसमोर कमी धावसंख्येचे आव्हान होते. त्यामुळे श्रेयस अय्यरने काही प्रयोग करून नवीन खेळाडूंना प्रथम खेळण्याची संधी दिली.अंगक्रिश रघुवंशी आणि आयुष म्हात्रेची जोडी सलामीला उतरली आणि दोघेही अनुक्रमे १९ आणि २८ धावा करत बाद झाले. हार्दिक तामोरे आणि शार्दुल ठाकूर शून्यावर बाद झाले. तर सय्यद मुश्ताक अली अंतिम सामन्याचे हिरो सूर्यांश शेडगे आणि अथर्व अंकोलेकरही स्वस्तात बाद झाले. यानंतर तनुष कोटियनने ३९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.सूर्यकुमार यादव आठव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. तो २३ चेंडूत केवळ १८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

### अय्यरने पुन्हा एकदा लक्ष वेधलं

या खेळीत सूर्याने दोन चौकार आणि एक षटकार लगावला. यानंतर कर्णधार श्रेयस अय्यर नवव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरला. जेव्हा सूर्यकुमार यादव बाद झाला तेव्हा संघाची धावसंख्या १०५ धावा होती, याचा अर्थ विजयासाठी मुंबईला अजून बऱ्याच धावांची गरज होती तर चेंडूही बाकी होते. तेव्हा श्रेयस अय्यरने जबाबदारी स्वीकारली आणि आपल्या संघाला विजयाकडे नेले. श्रेयस अय्यरने २० चेंडूत ४४ धावांची अप्रतिम खेळी केली. यादरम्यान त्याने चार चौकार आणि तीन षटकार लगावत प्रतिस्पर्धी संघाचा पराभव केला. नुकत्याच झालेल्या सय्यद मुश्ताक अली टी-20 स्पर्धेतही श्रेयस अय्यरने उत्कृष्ट खेळी करत संघाचे उत्तम नेतृत्त्व करत जेतेपद पटकावून दिले.सध्या भारतीय संघाबाहेर असलेल्या श्रेयस अय्यरने या वर्षी ऑगस्टमध्ये श्रीलंकेविरुद्ध भारताकडून शेवटचा एकदिवसीय सामना खेळला होता. श्रेयस अय्यरला टी-२० आणि कसोटी संघातही स्थान मिळू शकले नाही.

# स्टार फलंदाज मानधनाचा विश्वविक्रम

## इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात 91 धावांची खेळी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करत ३१४ धावा केल्या. टीम इंडियाच्या मोठ्या धावसंख्येमध्ये स्मृती मानधनाचे मोठे योगदान. या सामन्यात तिने ९१ धावांची खेळी खेळली.**



मानधनाने पहिल्या विकेटसाठी प्रतिका रावतसह ११० धावांची आणि हरलीन देओलबरोबर दुसऱ्या विकेटसाठी ५० धावांची भागीदारी केली, या सामन्यात तिचे शतक हुकले. मात्र तिने एक विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे.भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधना सध्या जबरदस्त फॉर्मात आहे. मानधना प्रत्येक सामन्यात एकापेक्षा एक विविध विक्रम आपल्या नावे करत आहे. दरम्यान, पहिल्या एकदिवसीय सामन्यादरम्यान तिने एक विक्रम केला आहे. महिलांच्या आंतरराष्ट्रीय सामन्यात एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक धावा करणारी ती फलंदाज ठरली आहे. तिने २०२४ मध्ये आतापर्यंत १६०२ धावा केल्या आहेत. यापूर्वी हा विक्रम दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोल्वार्डच्या नावावर होता. यंदाही तिने हा विक्रम केला आहे. २०२४ मध्ये त्याच्या नावावर एकूण १५९३ धावांची नोंद आहे.भारतीय स्टार स्मृती मानधना जबरदस्त फॉर्ममध्ये परतली आहे. टीम इंडियासाठी खेळलेल्या गेल्या पाच सामन्यांमध्ये तिने अप्रतिम फलंदाजी केली आहे. ज्यामध्ये एक शतक आणि चार अर्धशतकांचाही समावेश आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात त्याने १०५ धावांची इनिंग खेळली होती.

### मानधना सध्या जबरदस्त फॉर्मात

यानंतर, वेस्ट इंडिजविरुद्ध पहिल्या टी-२० मध्ये ५४ धावा, दुसऱ्या टी-२० मध्ये ६२ धावा आणि तिसऱ्या टी-२० मध्ये ७७ धावा केल्या. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात मंधानाने ९१ धावांची खेळी केली. मानधनाने पहिल्या विकेटसाठी प्रतिका रावतसह ११० धावांची आणि हरलीन देओलबरोबर दुसऱ्या विकेटसाठी ५० धावांची भागीदारी केली, या सामन्यात तिचे शतक हुकले. मात्र तिने एक विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे.भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधना सध्या जबरदस्त फॉर्मात आहे.